स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
## महासमादेशकांचे कार्यालय, होमगार्ड मुख्यालय

जुने सचिवालय विस्तार गृह, ३ रा मजला, म. गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२
दूरध्वनी क्रमांक - ०२२-२२८४२४२३, २२८४३६६७, Email - cghgesst@yahoo.com

जावक पत्र क्र.मस/कार्या-२/२०२२/ ९६७७ दिनांक : 25 JUL 2022

**अत्यंत तातडीचे**

प्रति,
सर्व जिल्हा समादेशक,
होमगार्ड, महाराष्ट्र राज्य.

समादेशक,
होमगार्ड, बृहन्मुंबई

समादेशक,
मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, होमगार्ड, घाटकोपर, मुंबई.

विषय:- गट-ड संवर्गातून गट-क संवर्गात वाहन चालक पदावर नियुक्तीबाबत.

संदर्भ :- १) शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई दि.२ मार्च २०१७.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१, दि.१४-१-२०१६.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन अधिसुचनेच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, होमगार्ड विभागातील रिक्त असलेल्या वाहन चालकाच्या पदावर गट ड च्या इच्छुक कर्मचा-यांना पदोन्नती देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी आपल्या कार्यालयातील खालील अटींची पुर्तता करीत असलेल्या कार्यरत गट ड च्या इच्छुक कर्मचा-यांची माहिती त्यांचे अर्जासह सर्व शैक्षणिक व अन्य कागदपत्रांच्या प्रती मुख्यालयास दि.३१-७-२०२२ पर्यंत पाठविण्यात यावी.

१) गट ड पदावर किमान ३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक आहे.
२) ज्यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतुदीनुसार सक्षम अनुज्ञाप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना धारण केला आहे .(परवान्याची मुदत संपलेली नसावी)
३) ज्यांनी शासन मान्यताप्राप्त माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण् केली आहे.
४) मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

.. २

५) ज्यांना वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख आहे व ज्यांचेकडे शारीरीक क्षमता आहे.

६) टीप : वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख यामध्ये खालील बाबी येतात :-

(१) वाहनचालक कोणतीही मादक द्रव्ये किंवा अल्कोहोल सेवन करुन वाहन चालविण्याचा किंवा मोटार वाहन अधिनियम. १९८८ (१९८८ चा ५९) मधील कोणतयाही दखल पात्र अपराधासाठी दोषी सिध्द झालेला नसावा.

(२) वाहनचालकाविरुध्द अपघाताचा गुन्हा दाखल झालेला नसावा.

७) ज्यांना संबंधित क्षेत्राची परिपुर्ण भौगोलिक माहिती आहे.

८) ज्यांना मराठी, हिंदी भाषा वाचता, बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे.

९) सबंधितांनी नियुक्ती पूर्वी शारीरिक दृष्टया पात्र असल्याचे व दृष्टी चांगली असल्याचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

विहित कालावधीत प्राप्त न होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही याबाबत सबंधितांनी नोंद घ्यावी.

(मा.महासमादेशक यांचे आदेशानुसार)

( वि.भा.पवार )
कनिष्ठ प्रशासिक अधिकारी,
महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्यकरीता.